# मराठवाड्यातील समाजवादी काँग्रेस - एक अभ्यास

( १९८० - १९८५ )

## प्रकरण पाचवे

---

## उपसंहार

---

=/=/=/=/=/=/=/=

# प्रकरण पाचवे

## उपसंहार.

### अभ्यासाचा उद्देश :

मराठवाड्यातील समाजवादी कॉंग्रेस – एक अभ्यास (१९८०-८५) हा विषय अभ्यासासाठी निश्चित करीत असताना त्यासंबंधीचे उद्देश पुढीलप्रमाणे ठेवले होते.

मराठवाडा हा महाराष्ट्रातील एक उपविभाग असून त्या विभागातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक , राजकीय जडण घडण इतर विभागांच्या तुलनेत निराळे वैशिष्ट्ये ठेवणारी आहेत.

१९७७ च्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात कांही नवे बदल झाले. यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व मानणारा एक मोठा गट १९७८ साली शरद पवारांच्या नेतृत्वाखाली बाहेर पडला आणि जवळ जवळ आठ वर्षें हा गट अरस कॉंग्रेस व नंतर समाजवादी कॉंग्रेस या नांवाने कॉंग्रेसच्या बाहेर होता. १९८१ साली या गटाचे पुढारी यशवंतराव चव्हाण आपल्या पाठीराख्यासह कॉंग्रेस (इं) पक्षात सामिल झाले पण शरद पवार यांनी समाजवादी कॉंग्रेस हा पक्ष जिवंत ठेवला आणि १९८५ च्या निवडणूकीत १९८० पेक्षाही जास्त जागा जिंकून दाखविल्या. चव्हाणांच्या बरोबर जवळ जवळ सर्व वरिष्ठ पुढारी गेलेले असतानाही त्यांनी समाजवादी कॉंग्रेसला नवजीवन दिले.

समाजवादी कॉंग्रेसला पश्चिम महाराष्ट्रातील कांही जिल्हे वगळता खरा पाठिंबा मराठवाड्यामध्ये मिळाला. मराठवाडा हा तसा मागासलेला

......

भाग पण या विभागात राजकीय जागृती मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पवारांच्या पक्षास या भागात नवे कार्यकर्ते व पाठीराखे मिळाले. शेतकरी संघटना व जुन्या संसोपा – लोकदलामध्ये काम करणारे कार्यकर्ते पक्षात सामील झाले. १९७८ नंतर मराठवाड्यात पक्षाची झालेली वाढ महाराष्ट्राच्या प्रक्रियेत काही नवे वर्ग व गट घुसत असल्याचे एक चिन्ह होते. राज्यातील विविध उपविभागात चालणाऱ्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास संपूर्ण राजकारण समजण्यासाठी आवश्यक असतो म्हणून मराठवाड्यातील काँग्रेस (स) चा उदय आणि विकास यांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे. या अभ्यासात चार प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला आहे.

१. मराठवाड्यातील थोड्या वेगळ्या अशा राजकीय प्रक्रियेची महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील भूमिका.

२. काँग्रेस (अ) च्या मराठवाड्यातील यशाची कारणे.

३. शरद पवार यांनी यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर न जाता आपला पक्ष वेगळा ठेवला आणि नवे पुढारी व कार्यकर्ते यांच्या मदतीने त्याची नवी बांधणी कशी केली ?

४. पवारांना शेतकरी संघटना व मराठवाड्यातील इतर चळवळी यापासून कसा फायदा झाला.

या सर्व प्रश्नांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यांत आला आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केलेला आहे. या पध्दतीत भूतकालीन राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करीत असताना कागदपत्रे, वृत्तपत्रे, नियतकालिके, प्रकाशने, पुस्तके, संशोधन निबंध, प्रमुख व्यक्तींच्या मुलाखती या साधनांचा वापर केलेला आहे. ग्रंथालयाचा आधार या अभ्यासात प्रमुख आहे.

.....

सारांश :

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात मराठवाडयातील १९७७ पर्यन्तच्या राजकीय विकासाचा अभ्यास करण्यात आला आहे. मराठवाडा हा निजामाच्या संस्थानातील एक विभाग म्हणून अस्तित्वात होता. या संस्थानात बहुभाषिक, भिन्न सांस्कृतिक परंपरा असलेले लोक राहत होते.

निजामाच्या जुलमी व जनातवादी राजवटीच्या विरोधात जनमत संघटीत करुन स्वातंत्र्य चळवळ व हैद्राबाद मुक्ती लढयाची चळवळ शांततामय मार्गाने स्टेट कॉंग्रेस या संघटनेने चालविली. राष्ट्रवादी विचार जनतेत रुजवून जबाबदार शासन प्रणाली संस्थानात निर्माण व्हावी यासाठी ही संघटना कार्यरत होती. संस्थान विलीन झाल्यानंतर हैद्राबाद राज्यात कॉंग्रेसला सत्ता मिळाली. मराठवाडयातून भरघोस पाठिंबा मिळाल्यामुळे कॉंग्रेसची पकड कायम राहिली. स्टेट कॉंग्रेसचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांच्याकडे होते. नंतर संघटनेत मराठी - तेलगू भाषिक वाद सुरु झाला. भाषावर प्रांतरचनेपर्यन्त हा वाद अस्तित्वात होता. भाषावार प्रांत रचना झाल्यानंतर मराठवाडा व्दिभाषिक मुंबई राज्याचा एक भाग बनला. पुढे संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर त्याचा महाराष्ट्रात समावेश झाला. १९५२ ते १९७१ या काळात झालेल्या सर्व निवडणूकात मराठवाडयावर कॉंग्रेसचे वर्चस्व कायम राहिले. १९६२ नंतर सुरु झालेल्या पंचायत राज्य संस्थात स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना सामावून घेण्याची प्रक्रिया सुरु झाली. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा देशभरात पराभव झाला. त्यात मराठवाडयात देखील पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर शंकरराव चव्हाण यांची मुख्यमंत्री पदावरुन उचलबांगडी करुन वसंतदादा पाटील राज्याचे मुख्यमंत्री बनले.

दुस-या प्रकरणात आणिबाणीनंतरच्या महाराष्ट्राच्या

......

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

राजकारणाचा व कॉंग्रेसच्या विघटनाचा अभ्यास करण्यात आला आहे. १९७८ च्या निवडणूकीत कोणत्याही पक्षास बहुमत प्राप्त न झाल्यामुळे वसंतदादानी इंदिरा कॉंग्रेसच्या मदतीने सरकार बनविण्यात यश संपादित केले. यशवंतराव चव्हाणांचा या आघाडीच्या सरकारला विरोध असल्यामुळे व शरद पवारांची व्यक्तीगत महत्वकांक्षा या कारणामुळे दादांचे सरकार पाडून जनता पक्ष व मित्रपक्षांच्या सहकार्याने पुलोद सरकार स्थापन करण्यात शरद पवार यशस्वी ठरले. पुलोद सत्तेवर असताना झालेल्या जिल्हा परिषद निवडणूकांत पवारांच्या समांतर कॉंग्रेसने मोठ्या प्रमाणात जागा मिळवून ग्रामीण भागात वर्चस्व टिकविण्यात व आपली पाळेमुळे रूजविण्यात पवारांना यश मिळाले.

तिसऱ्या प्रकरणात शरद पवारांनी कॉंग्रेस (स) पक्षास १९८० च्या विधानसभा निवडणूकीनंतर कशाप्रकारे संघटित केला. १९८१ नंतर यशवंतराव चव्हाण यांनी पक्ष त्याग केल्यानंतरही पक्षाची बांधणी कशाप्रकारे केली याची चर्चा केलेली आहे.

चौथ्या प्रकरणात १९८४ च्या निवडणुकीनंतरच्या राजकारणाचा आढावा घेण्यात आला आहे. १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत इंदिरा कॉंग्रेसला बहुमत प्राप्त झाले. राज्यात कॉंग्रेस (स) प्रमुख विरोधी पक्ष म्हणून लढत देत होता. अवघ्या दोन महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणूकीत कॉंग्रेस (स) ला ५४ जागा मिळाल्या. पुलोदला बहुमत प्राप्त झालेले नसले तरी प्रबळ विरोधक म्हणून संख्याबळ वाढले. विधानसभा निवडणुकीनंतर पवारांनी राजीव गांधींच्यासोबत राष्ट्रीय स्तरावर जमवून घेण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यात पुलोद अंतर्गत वाद वाढला. पवारांनी इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. या प्रश्नावर पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवर मतभेद होवून पक्ष फुटला पण बहुमत मात्र पवारांच्या सोबत राहिले.

......

# अभ्यासाचे निष्कर्ष

**काँग्रेसचे वर्चस्व :**

मराठवाड्याच्या राजकारणावर काँग्रेसचे वर्चस्व होते. १९५७ साली देखील पक्ष मराठवाड्यात पाय रोवून उभा राहिला. १९६० नंतर पक्षाच्या सामर्थ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली पण १९७० पर्यन्त साखर कारखानदारी व पाटबंधारे यांचे प्रमाण कमी असल्यामुळे राजकारणावर जुन्या सरंजामशाही पुढा-यांचेच वर्चस्व होते.

१९५२ ते १९७१ या काळात झालेल्या सार्वत्रिक व स्थानिक संस्थांच्या निवडणूकीत मराठवाडा काँग्रेसच्या बाजूनेच राहिला. स्टेट काँग्रेसच्या -नंतर पक्षात नवी भरती झाली. ग्रामीण भागातील नेतृत्व पुढे येवू लागले पण शिस्तबध्द स्वरूपाचे संघटन बांधण्यात फारसे यश मिळाले नाही. पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्वावरच या भागातील राजकारण अवलंबून राहिले. त्यामुळे दृष्टीहिन नेतृत्वाची वाढ होवून विभागाच्या विकासाला योग्य दिशा मिळू शकली नाही. त्याचा परिणाम मागासलेपणा कायम रहाण्यात झाला.

पश्चिम महाराष्ट्रात ज्या वेगाने सहकारी चळवळीच्या माध्यमाने संस्थात्मक राजकीय जीवन विकसित झाले त्या तुलनेत मराठवाड्यात नेतृत्वाच्या कमकुवतपणामुळे उशिरा सुरु झाला.[१] पंचायत राज्याच्या निर्मितीनंतर इतर विभागात नेतृत्व विकसित होण्याची प्रक्रिया ज्या वेगाने घडली त्यातूनच राज्य पातळीवर परिपक्व नेतृत्व मिळाले ते मराठवाड्यात न घडल्यामुळे नेतृत्वाची साखळी निर्माण होवू शकली नाही.

मराठवाड्यात काँग्रेस व्यतिरिक्त शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, संघटना काँग्रेस, रिपब्लीकन पक्ष, जनता पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हे विरोधी पक्ष कार्यरत होते.

शेतकरी कामगार पक्ष हा प्रमुख विरोधी पक्ष म्हणून मराठवाड्यात अस्तित्वात होता. ग्रामीण भागात या पक्षाची पकड होती

.....

पण संघटनात्मक बांधणीचा अभाव, नव्या भरतीकडे दुर्लक्ष यामुळे हा पक्ष दिवसेंदिवस क्षीण होत गेला.

साम्यवादी पक्षाला १९५२ नंतर मराठवाड्यात आपले फारसे स्थान टिकवता आले नाही. पुढे पक्षात फूट झाल्यानंतर माजलगांव (बीड) व कळमनुरी (परभणी) या मतदार संघात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष शिल्लक राहिला. भारतीय कम्युनिस्ट पक्ष मात्र नाममात्र आहे.

समाजवादी पक्षाला फारसे यश मिळू शकले नाही. पण त्यांच्याकडे युवकांचा मोठा गट आकर्षित झालेला होता. जनता पक्षाच्या काळात त्यांना यश प्राप्त झाले. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या विसर्जनानंतर स्थापन झालेल्या रिप. पक्षाची अंतर्गत गटबाजीमुळे वाढ होवू शकली नाही. संघटना काँग्रेस व जनसंघाला मराठवाड्यात फारसे स्थान नव्हते.

१९७७ च्या निवडणूकीनंतर जनता पक्ष उदयास आला. मराठवाड्यात लोकसभेच्या तीन व विधानसभेच्या १६ जागा या पक्षाने १९७७ व १९७८ च्या निवडणूकीत जिंकल्या. पण पुढे मात्र त्यांना एकही जागा कायम राखता आली नाही. संघटनात्मक बांधणी त्यांच्याकडेही नव्हती. काँग्रेस (स) हा १९८० व १९८५ च्या निवडणूकीत प्रमुख विरोधी पक्ष म्हणून मराठवाड्यात पुढे आला. १९८० व १९८५ च्या विधानसभा निवडणूकीत पक्षाला अनुक्रमे १७ व १६ जागा या विभागात जिंकता आल्या. १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत पक्षाला एक जागा मिळाली.

<u>काँग्रेसचा संक्रमण काळ :</u>

१९७७ च्या लोकसभा निवडणूकीत मराठवाडा विभागात काँग्रेसचा दारूण पराभव झाल्यामुळे काँग्रेसचे वर्चस्व प्रथमत:च संपुष्टात आले. १९७८ पूर्वी शंकरराव चव्हाण काँग्रेसमधून बाहेर पडले. दरम्यान इंदिरा काँग्रेस निर्माण

.....

झाली. जनता पक्षात कांही काँग्रेसजन गेले. या पार्श्वभूमीवर झालेल्या १९७८ च्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेस (स्व) ला फक्त १६ जागा या विभागात मिळाल्या. दादांच्या मंत्रीमंडळातून शरद पवार बाहेर पडल्यानंतर मराठवाडयातून बहुसंख्य आमदार पक्षातून बाहेर पडले. यामुळे काँग्रेस (स्व) चे अस्तित्व नाममात्र शिल्लक राहिले. पुढे १९८० च्या दरम्यान काँग्रेस (स्व) चे कार्यकर्ते इंदिरा काँग्रेस व अरस काँग्रेस असे विभागले गेले.

समाजवादी काँग्रेसच्या उदयाची कारणे :

पुलोद आघाडीच्या सरकारची महाराष्ट्रात स्थापना झाल्यानंतर शरद पवार व त्यांच्या सहका-यांनी समांतर काँग्रेसची स्थापना केली. या पक्षाने १९७९ साली झालेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणूकीत यश संपादित करुन ग्रामीण भागात पकड निर्माण केली. पुढे समांतर काँग्रेस अरस काँग्रेसमध्ये विलीन झाल्यानंतर झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत पक्षाने स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी इंदिरा काँग्रेसशी लढती देवून एक लोकसभेची व सत्तेचाळीस विधानसभेच्या जागा जिंकल्या. मराठवाडयात अरस काँग्रेसने १७ जागा मिळवून वर्चस्व कायम टिकविले. १९८० साली झालेल्या शेतकरी संघटनेच्या कांदा आंदोलनाचा लाभ घेण्याचा प्रयत्न शरद पवारांनी केला.

शरद पवारांचे नेतृत्व पुढे येत असतानाच १९८१ साली पक्षाचे जेष्ठ नेते यशवंतराव चव्हाण ४२ आमदार व प्रमुख सहका-यासह पक्षातून बाहेर पडले. स्थानिक व राज्य पातळीवरील कार्यकर्तेही चव्हाणांच्यासोबत इंदिरा काँग्रेसमध्ये मोठ्या संख्येनी गेले. पवारांनी आपल्या शिल्लक असलेल्या सहका-यासह इंदिरा काँग्रेसमध्ये न जावून पक्षाचे अस्तित्व कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. याच काळात पक्षाचे अध्यक्षपद पवारांना मिळाले. हा पक्ष "समाजवादी काँग्रेस " या नांवाने पुढे येवू लागला. पवारांनी या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व का ठेवले या मागची भूमिका पुढील आधारावरुन स्पष्ट होवू शकते.

.....

१. इंदिरा गांधींच्या व्यक्ती केंद्रीत राजकारणात कोणताही बदल झालेला नव्हता. त्यामुळे पवार, अरस, रजनी पटेल, उन्नीकृष्णन या नेत्यांनी पक्षाचे अस्तित्व स्वतंत्र ठेवून काम करण्याचा निर्णय घेतला.

२. महाराष्ट्रात अंतुले – आदिक यासारख्या एकनिष्ठांच्या सोबत काम करण्यापेक्षा स्वतंत्र अस्तित्व ठेवून जनमानसात आपली प्रतिमा उजळ करण्याचा मनोदय पवारांचा होता.

३. इंदिरा गांधींच्या राजकारणात " बहुसंख्यांक " असलेल्या मराठा जातीतील सधन मंडळींच्या राजकीय आकांक्षा चिरडल्या जात असल्याची भावना पसरत असल्यामुळे त्याचा फायदा पक्ष वाढीस होवू शकतो अशी अपेक्षा पवारांना वाटत असावी.

४. इंदिरा कॉंग्रेसमध्ये दादा, चव्हाण यांची जी दयनीय अवस्था झालेली होती त्यामुळे बाहेरच राहणे पवार व त्यांच्या सहका-यांनी हिताचे मानले.

५. इंदिरा गांधी व त्यांच्या समवयस्क असलेल्या इतर पक्षातील पुढा-यांच्या हयातीनंतर राष्ट्रीय स्तरावर पवार यांच्या वयोगटातील नेतृत्व दिसत नव्हते. जनमानसात प्रतिमा उजळ करून शक्ती निर्माण केली तर राष्ट्रीय स्तरावर पोहोचता येवू शकते हा विचारही पक्षाचे अस्तित्व टिकविण्यापाठीमागे प्रमुख होता.

६. महाराष्ट्राच्या राजकारणात इंदिरा कॉंग्रेसमध्ये नेतृत्वासाठी सुरु असलेली लाथाळी व त्यातून निर्माण होणारी अस्थिरता याचा नेमका फायदा उठवता येवू शकेल हा एक विचार यामागे होता.

७. महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन व गिरणी कामगारांचा प्रश्न यामुळे असंतोष वाढत होता. त्याचा फायदा पक्ष वाढीस करून घेण्याचा प्रयत्न पक्षाने केला.[२]

.....

८. राज्यातील मराठवाडा, कोंकण व विदर्भ या मागास विभागात लक्ष केंद्रीत करून संघटना बांधणी करणे व शेतकरी संघटनेच्या युवा शक्तीचा योग्य वापर करून घेणे पक्षाच्या वाढीस हिताचे ठरणारे होते, त्यादृष्टीने प्रयत्न करण्यांत आले.

९. राज्यातील जनता, शेतकरी कामगार पक्ष यासारख्या विरोधी पक्षात काम करणाऱ्या व राजकीय आकांक्षा बाळगणाऱ्या कार्यकर्त्यांत जी निराशा होती त्यांना पक्षात सहभागी करून घेवून पक्ष बांधणी करणे सोयीचे होईल.

१०. राष्ट्रीय स्तरावर ऐक्याचा प्रश्न दैनंदिन गुंता वाढवत होता. सरकारला या प्रश्नावर रास्त तोडगा काढण्यात अपयश मिळाले होते. त्याच दरम्यान आंध्र व कर्नाटक या राज्यात कॉंग्रेसचा पराभव झाला होता. विरोधकांना संघटीत करून पर्याय उभा केला तर यश मिळू शकेल अशी धारणा पक्ष जीवंत ठेवण्याच्या पाठीमागे होती.

११. अल्पसंख्यांक व मागास जनतेचे प्रश्न सुटत नव्हते त्यामुळे ही शक्ती इंदिरा कॉंग्रेसच्या विरोधात वळवता येईल असा अंदाज वाटत होता.

१२. महाराष्ट्रातील बहुसंख्य आमदारांनी पक्ष सोडला असला तरी मतदार आपल्या सोबतच आहेत. त्यामुळे राज्यातील जनतेला अस्मितेसारख्या भावनिक प्रश्नावर संघटीत करून आपण सत्ता हस्तगत करु शकतो असा आत्मविश्वास पक्ष नेत्यांना वाटत होता. पक्षाला संस्थात्मक राजकारणात काही भागात स्थान होते त्याचा पक्ष वाढीस फायदा करून घेण्याचा विचार पक्ष नेतृत्वाच्या समोर होता.

कॉंग्रेस (स) चे वर दिलेल्या प्रमुख कारणांच्याच अनुषंगाने स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याचा निर्णय पक्ष नेतृत्वाने घेतला. १९८१ नंतर शरद पवारांनी स्वत:च्या बळावर पक्षाचे अस्तित्व टिकवून पक्ष वाढविण्याचा प्रयत्न केला.

.......

समाजवादी काँग्रेसला मराठवाड्यासारख्या मागास विभागात पाठिंबा देणारे प्रमुख घटक पुढील प्रमाणे आहेत.

मराठवाड्याच्या मागासलेपणाकडे व विकासाकडे राज्यकर्त्या पक्षाने सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळे जनतेत असंतोष व अस्वस्थता निर्माण झालेली होती. बेकारी व बेरोजगारी यासारखे प्रश्न दैनंदिन जीवनात भेडसावत होते. या प्रश्नाशी निगडीत असलेल्या तरूणांचा गट पवारांच्या नेतृत्वाकडे आकर्षित झाला. मराठा जातीतील सधन व मध्यम शेतक-यांच्या राजकीय आकांक्षा या पक्षाच्या माध्यमातून प्रतिबिंबीत होवू शकतील अशी धारणा या घटकातील लोकांची पवारांना समर्थन देण्यामागे होती. त्यामुळे हा गट पक्षात सहभागी झाला.

मराठवाड्यातील जनता, लोकदल, शेतकरी कामगार पक्ष या विरोधी पक्षात काम करणा-या कार्यकर्त्यांचा शरद पवारांच्या नेतृत्वावर विश्वास दृढ होवून हे कार्यकर्ते पक्षात सहभागी झाल्यामुळे पक्ष वाढीस मदत झाली. युवक व विद्यार्थी चळवळीतून तयार झालेले कार्यकर्ते या पक्षात मोठ्या संख्येनी गेले.

शेतकरी आंदोलनामुळे मराठवाड्यात १९८२ नंतर शेतकरी संघटना वाढली. शासनाच्या विरोधात जनमत संघटीत होवू लागले. त्याचा फायदा मराठवाड्यात व इतरही भागात काँग्रेस (स) च्या वाढीस झाला. संघटनेची पकड ग्रामीण भागात होत गेल्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते शेतकरी आंदोलनात सक्रीय बनले. विश्वासार्हता निर्माण होण्यास मदत झाली.

शहरी मध्यमवर्गीय घटकात पवारांच्या नेतृत्वाबाबत कुतुहलाचे वातावरण दिसत होते. त्याचा फायदा वृत्तपत्रे व प्रसार माध्यमांच्या मदतीने पक्ष वाढीस झाला. पवारांनी पक्ष बांधणीस गती देवून व दौ-याच्या माध्यमातून सतत संपर्क ठेवून पक्ष बांधणीत यश संपादित केले. इतर विरोधी पक्षांच्या निष्क्रीयतेचा व अपु-या साधनांचा नेमका फायदा काँग्रेस (स) ने मराठवाड्यात व इतर भागात करून घेतला.

....

१९८४ च्या अखेरीस होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षातील परस्परात बोलणीसाठी म शरद पवारांनी पुढाकार घेतला. याच दरम्यान इंदिरा गांधींची हत्या झाल्यामुळे देशभरातील राजकीय वातावरणच अचानक बदलून गेले. राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न प्रमुख बनला. यामुळे केंद्रातील सत्ता प्रबळ असावी हा विचार चर्चेत दिसू लागला. याच वातावरणात लोकसभेच्या निवडणूका घोषित झाल्यानंतर विरोधकांच्या जागा वाटपाचे गु-हाळ शेवटपर्यन्त सुरूच होते. सत्ताधारी पक्षाने इंदिरा गांधीच्या हत्येचा व विरोधकातील विस्कळीतपणाचा फायदा करून घेतला. राजीव गांधींच्या उदयामुळे जनतेला नव्या पिढीतील कार्यक्षम व स्वच्छ नेतृत्व देण्यास पक्ष समर्थ आहे असा प्रचार सुरु ठेवल्यामुळे व देशाचे अस्थिरतेचे वातावरण पूर्ववत सुरळीत करण्याचे आश्वासन प्रसार माध्यमांच्या मदतीने मतदारावर बिंबविल्यामुळे देशभरात इंदिरा कॉंग्रेसला प्रचंड यश मिळाले.

महाराष्ट्रात कॉंग्रेस (स), जनता व शेतकरी कामगार पक्ष यांच्या आघाडीला फक्त चार जागांवर यश मिळाले. मराठवाडयात जागा वाटपावर विरोधकात समझोता करून कॉंग्रेस (स) ने आठपैकी चार जागा लढवून एक जागा जिंकली. राज्यात पक्षाला दोन जागा मिळाल्या.

लोकसभा निवडणूकीनंतर अवघ्या दोनच महिन्यात विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यामुळे पुन्हा विरोधी पक्षांना कंबर बांधून मैदानात उतरावे लागले. यावेळी कॉंग्रेस (स), जनता, भारतीय जनता पक्ष व शेतकरी कामगार पक्ष यांची पुलोद आघाडी करून "एक नेता एक कार्यक्रम " घेवून आघाडीने निवडणूक लढविली.

लोकसभा निवडणूकीतील पराभवाच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणूकीत आघाडीला राज्यात चांगले यश मिळाले. पण सत्ता मिळण्यासाठी लागणारे बहुमत मात्र मिळू शकले नाही. मुंबई, कोंकण विभागात इंदिरा कॉंग्रेसला घवघवीत यश मिळाले पण आघाडी या विभागात आपला प्रभाव

.....

दाखवू शकली नाही.

उर्वरित महाराष्ट्रात आघाडीने आपला कार्यक्रम जनतेत पोहोचविण्यात यश मिळविले. ग्रामीण भागात शेतकरी संघटनेच्या कार्याचा व कार्यकर्त्यांचा लाभ आघाडीला मिळाला. विदर्भात विरोधक पहिल्यांदाच मोठ्या संख्येने विजयी झाले. पश्चिम महाराष्ट्रात बरोबरीत चित्र राहिले. मराठवाड्यातील ४६ जागात २२ जागा पुलोदने जिंकल्या. त्यात काँग्रेस (स) १६, शेकाप ५ व भाजप १ असे संख्याबळ आहे.

महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला १६२ जागा मिळून बहुमत प्राप्त झाले. पुलोद आघाडीतील काँग्रेस (स) ५४, जनता २०, भाजप १६ व शेकाप १३ असे संख्याबळ राहिले.

मुंबई विभागात इंदिरा काँग्रेस, पुलोद, शिवसेना, कामगार आघाडी अशा लढती झाल्यामुळे विरोधकांच्या मतात विभागणी होऊन इंदिरा काँग्रेसला त्याचा फायदा मिळाला. राज्यात इंदिरा काँग्रेसला सत्ता प्राप्त झालेली असली तरीही लोकसभा निवडणुकीपेक्षा अवघ्या दोन महिन्यात मतांचे प्रमाण घटले असल्यामुळे बहुसंख्य जागा गमवाव्या लागल्या.

विधानसभा निवडणुकीत पुलोद आघाडीला सत्ता न मिळाल्यामुळे निराशेचे वातावरण निर्माण होवू लागले. यातून आघाडीत भांडणात सुरुवात झाली. काँग्रेस (स) व जनता पक्ष यांच्यातील वादास पुणे जिल्हा परिषदेतील अविश्वास ठरावावरून तोंड फुटले.

निवडणुकीनंतर पवारांनी राष्ट्रीय प्रश्नासंबंधी राजीव गांधींना मदत करून त्यांच्यासोबत जमवून घेण्याची भूमिका घेण्यास सुरुवात केली. पंजाब प्रश्नावर त्यांनी मध्यस्थाची भूमिका पार पाडली त्यामुळे राजीव गांधींची जवळीक करीत असतानाच पक्षात या प्रश्नावरून विरोधा सुरु झाला.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

राजीव गांधींचे राष्ट्रीय राजकारणात अचानक झालेले आगमन यामुळे पवारांच्या राजकारणाला व महत्वाकांक्षाना मर्यादा पडू लागल्या. याची जाणीव होवू लागली. महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता प्राप्त होवू शकत नाही याची त्यांना स्पष्ट कल्पना विधानसभा निवडणूकीत आली. आघाडीच्या राजकारणात परस्परांना सांभाळून घेण्यात शक्तीपात होतो याचीही कल्पना शरद पवारांना पांच वर्षांच्या काळात आलेली होती. महाराष्ट्रातील ज्या घटकांच्या विश्वासावर पक्ष वाढेल असे वाटत होते तो शेतकरी समाजातील घटक पूर्णत: एकाच पक्षाच्या पाठीमागे येवू शकत नाही व इतर अल्पसंख्यांक घटक या समाजाचा पाठिंबा आहे असे वातावरण बनल्यामुळे जवळ येत नाहीत अशी विचित्र अवस्था निर्माण झाली. हितसंबंध जोपासण्यासाठी सहकारी संस्थातील कार्यकर्ते शक्यतो सत्ताधारी पक्षाच्या सोबत राहण्याचा प्रयत्न करतात. यामुळे संस्थात्मक राजकारणात काँग्रेस (स) फारसे यश मिळवू शकली नाही.[२] राज्यातील काँग्रेस संस्कृतीतून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांत सत्ता नसल्यामुळे अस्वस्थतेचे वातावरण वाढू लागले व त्यातूनच इंदिरा काँग्रेसमध्ये जाण्याचा विचार पक्षात प्रबळ होत गेला.

महाराष्ट्रात सातत्याने नेतृत्व बदलण्याची प्रक्रिया सुरु झाली. १९८० नंतर पाच मुख्यमंत्री झाले. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला धोका होवू शकतो अशी भीती काँग्रेस (इं) श्रेष्ठींस वाटत होती. त्यात पवारांसारखा प्रबळ विरोधकच आपल्या पक्षात सहभागी करुन घेतला तर विरोधकांना नेस्तनाबूत करता येईल असा एक विचार वाढू लागला.

महाराष्ट्रातील शेतकरी संघटना व शिवसेना या संघटनांना मिळणारा वाढता पाठिंबा पवारांना पक्षात प्रवेश दिला तर ते आपल्या संघटित शक्तीने त्यांना रोखू शकतील यादृष्टीने त्याचा पक्षात उपयोग करुन घेणे सोयीचे होईल. शिवसेना ग्रामीण भागात शक्ती वाढवत आहे हे काँग्रेसच्यादृष्टीने चिंताजनक बाब आहे.[३]

.....

डिसेंबर १९८६ मध्ये औरंगाबाद येथे होणाऱ्या कॉंग्रेस (स) च्या अधिवेशनात विलीनीकरणाचा निर्णय होईल अशी चर्चा सुरु असतानाच कार्यकारिणीने उन्नीकृष्णन, देव यांना निलंबित करुन विलीनीकरणाचा निर्णय घेतला. सिन्हा, देव, उन्नीकृष्णन या अल्पमतात असलेल्या नेत्यांनी पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याचा निर्णय घेतला. पण बहुसंख्य प्रदेश समित्या पवारांच्या मताशी अनुकूल होत्या.

औरंगाबाद येथे झालेल्या अधिवेशनात राजीव गांधी यांच्या उपस्थितीत पक्षाच्या विलीनीकरण निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. महाराष्ट्रातील एक आमदार वगळता सर्व आमदार, खासदार, प्रदेश समितीसह सर्वांनी विलीनीकरणास मान्यता दिली.

समाजवादी कॉंग्रेस हा राजकीय पक्ष म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात पवारांच्या नेतृत्वाखाली पाच – सहा वर्षे अस्तित्वात होता. त्याची वाढ मराठवाड्यासारख्या अविकसित विभागात मोठ्या प्रमाणावर झाली. पवार पश्चिम महाराष्ट्रातील पुढारी असून देखील मराठवाड्यात त्यांचे नेतृत्व पाय रोवून उभे राहिले. त्यांना १९८० व १९८५ या दोन्ही विधानसभा निवडणुकात नेत्रदिपक यश प्राप्त झाले. त्यांत पवारांच्या नेतृत्वाच्या आकर्षणाचा एक भाग मानला तरी मराठवाड्यातील इतर विरोधी पक्षांच्या तीव्र वर्षांच्या कामातून निर्माण झालेल्या राजकीय जागृतीचा उपयोग समाजवादी कॉंग्रेसच्या वाढीस झाला हे मान्य करावे लागेल.

शेतकरी संघटनेच्या अल्पावधीत झालेल्या वाढीचा व कार्यकर्त्यांच्या संचाचा फायदा देखील या पक्षाला मराठवाड्यात मिळाला. समाजवादी कॉंग्रेसच्या रुपाने निर्माण होवू लागलेली पर्यायी शक्ती विलीनीकरणाच्या निर्णयामुळे पुन्हा एकदा मोडून पडली. साधनांचा अभाव असलेले विभागातील इतर विरोधी पक्ष त्यांची पोकळी भरुन काढू शकतील किंवा नाही हे येणारा काळच ठरवू शकणार आहे.

-----------------------//////////////-----------------------

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

### संदर्भ सुची


१. कामत ए. आर. " भारतातील सामाजिक बदलावरील निबंध " सोमय्या प्रकाशन, मुंबई १९८३.

२. गरूड शांताराम (संपादित) कृष्णी औद्योगिक समाजाचे २५ वर्षे, समाजवादी प्रबोधिनी प्रकाशन, इचलकरंजी १९८५.

३. दैनिक टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई जानेवारी १९८७


------------------//////////////---------------------